Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XIV Issue – II March - April 2025

# प्राथमिक शाळेतील शिक्षकाच्या अवांतर वाचनाचा चिकित्सक अभ्यास संशोधन विषयाची संकल्पनात्मक पार्श्वभूमी आणि सद्य:स्थिती

संशोधकाचे नाव
श्रीम. सोनाली राजेंद्र कळसकर
*मातोश्री आसराबाई दराडे महिला शिक्षणशास्त्र महाविदयालय*
*यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ*
*अभ्यासकेंद्र येवला 54499*

मार्गदर्शकाचे नाव
डॉ. रश्मी जोशी
*मातोश्री आसराबाई दराडे महिला शिक्षणशास्त्र महाविदयालय*
*यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ*
*अभ्यासकेंद्र येवला 54499*

**सारांश**

***शिक्षणाचे प्रमुख उद्दिष्ट्य विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे हे असून व्यक्तिमत्वाचे एक प्रभावी साधन आहे.मानवी जीवन प्रकाशमय करण्याचे काम शिक्षणच प्रामुख्याने करते.शिक्षकाचे कार्य हे ज्ञानदानाचे व विद्यार्थ्यांना घडवणे हे आहे.शिक्षकांचे विशिष्ट मर्यादेपर्यंतच शिक्षण प्रशिक्षण झालेले असते. त्यामुळे विद्यार्थी मार्ग्दर्श्नावर मर्यादा पडतात. म्हणून ज्ञानाची कास धरणे आवश्यक आहे.शिक्षकांचे शब्दसंग्रह विचारांची कस यासाठी शिक्षकांचे अवांतर वाचन वाढले पाहिजे.ज्ञान वर्धनासाठी शिक्षकाला अवांतर वाचनाची आवश्यकता आहे.***

***वाचनामुळे ज्ञानवर्धन तर होतेच त्याशिवाय वाचन हि चिरंतन राहण्याची गुरुकिल्ली आहे. पुस्तकातील संस्कार फार खोलवर रुजवणारे असतात.मानवाला नवीन ज्ञान वाचनातून मिळते. तसेच विचारांची दिशा बदलते.अवांतर वाचनामुळे शिक्षणाचे उद्दिष्ट्ये साध्य होऊ शकते.सध्या ज्ञानाचे क्षेत्र झपाट्याने विस्तृत होत आहे.हा विस्तार ज्ञानदानाद्वारे समजून घेता येईल.अवांतर वाचनाने विषय अध्यापन करताना अध्यापनात मुलांना रुची वाटेल तसेच त्यांना कठीण वाटणारा विषय देखील विविध उदाहरणे दाखले देऊन गोष्टीरूपाने प्रात्यक्षिकाद्वारे समजावून दिल्यास सोपा वाटेल.मुलांना अभ्यासात रुची निर्माण होईल.***

CC BY *Global Online Electronic International Interdicipilinary Research Journal's* licensed Based on a work at *http://www.goeiirj.com*

**महत्वाचे शब्द :** अवांतर वाचन, प्राथमिक शाळेतील शिक्षक

अवांतर वाचन म्हणजे अभ्यासक्रमाबहेरची पुस्तके किंवा लेख वाचणे जी आपल्या ज्ञानाला आणि आवडीला वाढवतात.अवांतर वाचनामुळे ज्ञान व माहितीचा विस्तार होतो,विविध प्रकारच्या साहित्यामुळे शब्दांची निवड आणि वाक्य रचना सुधारते वाचनामुळे विविध दृष्टीकोन आणि विचारसरणी सुधारते व समजूतदारपणा वाढतो.अवांतर वाचनाची अभ्यासाची सांगड घातल्यास विषय अधिक चंगल्या प्रकारे समजण्यास उपयोग होतो.मिळालेले ज्ञान वृद्धिंगत होऊन आयुष्यभर उपयोगी ठरते.तसेच वाचनाने आत्मविश्वास निर्माण होतो.

**प्राथमिक शाळेतील शिक्षक –**

प्राथमिक शाळेतील शिक्षक म्हणजे लहान वयोगटातील म्हजे बालवाडी ते पाचवी पर्यंत मुलांना शिकवणारे शिक्षक ते मुलांना वाचन , लेखन आणि गणित यासारख्या मुलभूत कौशल्यामध्ये मदत करतात आणि त्यांच्या सामाजिक – भावनात्नक विकासाला प्रोत्साहन देतात, तसेच विध्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करून त्याच्या क्षमता वाढवतात त्यांच्यात सकारात्मक दृष्टीकोन विकसित करण्यास मदत करतात.तसेच विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्य रुजवून त्यांना जबाबदार नागरिक बनवतात. प्राथमिक शिक्षक मुलांच्या जीवनात एक महत्वपूर्ण भूमिका बजावतात. ते त्यांना भावूश्यासाठी तयार करत असतात.

**प्राथमिक शाळेतील शिक्षकांच्या अवांतर वाचनाचा चिकित्सक अभ्यास संशोधन विषयाची पार्श्वभूमी**

प्राथमिक शाळेतील शिक्षकांशी संपर्क आल्यावर असे लक्षात आले कि, शाळेतील शिक्षकांचे अवांतर वाचन होत नाही. अध्ययन -अध्यापन करताना पुस्तकाबाहेरील उदाहरणे दाखले प्रसंग सांगता आले पाहिजे. पुस्तकातील आशयाचा संबंध इतर प्रसंगाशी लावता आला पाहिजे.म्हणून अवांतर वाचनाची गरज असते.

जर शिक्षकाजवळपायलीभर ज्ञान असेल तर तो विद्यार्थ्यांना माप्भर देऊ शकतो म्हणून या प्रस्तुत विषयावर संशोधन करण्याची गरज वाटली.अवांतर वाचनाचे महत्व लक्षात घेऊन प्रस्तुत समस्यांची निवड करण्यात आली आहे.

**संशोधन समस्येची सद्यस्थिती**

ज्ञान वर्धनासाठी शिक्षकाला अवांतर वाचनाची आवश्यकता असते. शिक्षणाचे ध्येये आणि उद्दिष्टांमध्ये विद्यार्थ्यांचा मानसिक, शारीरिक बौद्धिक विकास अपेक्षित आहे.जीवनात जेंव्हा जेंव्हा ग्रंथ प्रवेश करतात.तेंव्हा जीवनाला आकार येण्यास मदत होते.पुस्तकांमुळे मानवी संस्कृती, मानवाच्या आणि जगाच्या इतिहासाचे आकलन होण्यास मदत होते.पुस्तके म्हणजे केवळ माहितीचा साग नाही तर पुस्तक वाचून माणसाला प्रेरणा मिळते.

पुस्तके म्हणजे मुल्यांची पेरणी आहे.त्यासाठी शिक्षकांनी त्यांच्या जवळ असणार्या ज्ञानापेक्षा अधिक ज्ञानाची लालसा धरली पाहिजे.तेंव्हाच मुलांमध्ये मुलभूत कौशल्यांचा विकास होऊन त्यांचा सामाजिक – भावनिक बौद्धिक व नैतिक विकास घडून येईल.ते एक जबाबदार नागरिक बनतील.प्राथमिक शिक्षक मुलांच्या जीवनात एक महत्वपूर्ण भूमिका बजावतात.मानवाला नवीन ज्ञान वाचनातून मिळते. अद्ययावत ज्ञान हे वाचनातून मिळवून विद्यार्थ्याला देणे हे शिक्षकाचे कर्तव्य आहे.वाचनाने ज्ञान वर्धन होते तर विचारांची दिशा बदलते.

विद्यार्थ्यांनी सर्व विषयात निपुण होणे गरजेचे आहे.विद्यार्थ्यांना मिळालेल्या ज्ञानाचे व्यवहारात उपयोजन करता येईल. त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होईल.त्यांना दैनदिन जीवनात अडचण भासणार नाही.

**समारोप**

प्रस्तुत शोधनिबंधात संशोधन विषय समस्येशी पार्श्वभूमी ऐतिहासिक आढावा सद्यस्थिती याबाबत माहिती विवेचन करण्यात आले आहे.

**संदर्भ सूची**

1) भिंताडे, वि.रा.(2009) शैक्षणिक संशोधन पद्धती पुणे : नूतन प्रकाशन

2) मुळे रा.शं. आणि उमाठे वी. तू. (१९७७) , शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, नागपूर : महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती महामंडळ

3) घोर्मोडे के. यु. व घोर्मोडे के.के. ( 2008) शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, नागपूर : महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती महामंडळ

4) Best J.W. and kahn J.V. ( 2007) Research in education Prentice Hall of Indian Private Ltd. New Delhi.